# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेस नोट

**61/2025**

गुन्हे शाखा, नवी मुंबई — दिनांक १४.११.२०२५

# तळोजा,कंळबोली परिसरातील अंमली पदार्थाचे रॅकेट उधवस्त. नवी मुंबई अंमली पदार्थ विरोधी पथकाने केली कारवाई

श्री.मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, श्री. संजय येनपुरे, मा. पोलीस सह आयुक्त, श्री.दीपक साकोरे, मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, नवी मुंबई, श्री.सचिन गुंजाळ मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, यांनी नवी मुंबई नशामुक्त करण्याचे व अंमली पदार्थ सेवन व विक्री करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वपोनि संदीप निगडे यांना गुप्त बातमीदारांमार्फत मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वपोनि निगडे व त्यांचा स्टाफ यांनी दि. १४/११/२०२५ रोजी आरोपीत नामे १) नवज्योतसिंग कुलमितसिंग रंधावा उर्फ विकी, वय-३४ वर्षे, व २) गुरज्योत कुलमित सिंग रंधावा उर्फ सनी, वय-३२ वर्षे, दोन्ही रा. हेरिटेज कॅस्टल बिल्डींग, तळोजा फेज २, नवी मुंबई यांचे राहते घरी छापा टाकला असता त्यांचे राहते घरातुन बेकायदेशीररित्या विक्रीकरीता ठेवलेला अंमली पदार्थ १) १,१६,१९,०००/- रूपये किंमतीची १५८ ग्रॅम वजन असलेला **हेरॉईन** हा अंमली पदार्थ, २) १,००,५००/- रूपये किंमतीचा ४० ग्रॅम वजनाचा **अफीम** हा अंमली पदार्थ असा **एकुण १,१७,१९,५००/- (एक कोटी सतरा लाख एकोणीस हजार पाचशे)रूपये किंमतीचा हेरॉईन व अफीम** असा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला असुन त्यांचे विरूध्द तळोजा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर ३८४/२०२५ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ (एनडीपीएस) अधिनियम १९८५ चे कलम ८(सी), २१(बी),२१(सी),२९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर आरोपीत यांना माल पुरवठा करणारे व त्यांच्याकडुन माल विकत घेणारे अशा पाच पाहिजे आरोपींतांचा पोलीस शोध घेत आहेत. सदर गुन्हयाचा पुढील तपास वपोनि संदीप निगडे अंमली पदार्थ विरोधी कक्ष हे करीत आहेत.

श्री.मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, श्री. संजय येनपुरे, मा. पोलीस सह आयुक्त, श्री.दीपक साकोरे, मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, नवी मुंबई, श्री.सचिन गुंजाळ मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा,श्रीमती.प्रेरणा कटटे, सहा. पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वपोनि संदीप निगडे, पोहवा/१३७७ रमेश तायडे, पोहवा/४४६२ पदु दोरे, पोहवा /४४७६गणेश पवार, पोशि/४७०८ परमेश्वर भाबड (चालक),पोशि/४७६१ पाटील, मपोशि/४४८५ पगारे या पथकाने केली आहे.

---------oooo---------